जिल्हा परिषद, चंद्रपूर
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक
दिनांक 25 APR 2019
विभाग

# Umed-Maharashtra State Rural Livelihoods Mission
# उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष,
सिडको भवन, ५ वा मजला (दक्षिण बाजू)
सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई
पिनकोड : ४००६१४
दुरध्वनी : ०२२-२७५६२५५२/५४

State Mission Management Unit
CIDCO Bhavan, 5th Floor (South wing),
C.B.D. Belapur, Navi Mumbai
Pin Code : ४००६१४
Phone : ०२२ - २७५६२५५२/५४

PD DRDA

उमेद-एमएसआरएलएम/HR/९२२८(A)/२०१९ दिनांक - २०/०४/२०१९

जिल्हा परिषद, चंद्रपूर
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक
दिनांक 29 APR 2019
विभाग
919
30/4/19

जि.ग्रा.वि.य., चंद्रपूर
(आवक शाखा)
आवक क्र. 761
दिनांक 30/4/2019
विभाग NRLM
4/5/19

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष उमेद, चंद्रपूर
1160
दिनांक - 8 MAY 2019
प्रकल्प संचालक
जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, चंद्रपूर

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद तथा
जिल्हा अभियान संचालक,
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
सर्व जिल्हे

**विषय: महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांचे Performace Appraisal बाबत.**

**संदर्भ:** १. या कार्यालयाचे पत्र क्र.उमेद-एमएसआरएलएम/HR/२४५१ दि. ३१/०७/२०१८
२. या कार्यालयाचे पत्र क्र.उमेद-एमएसआरएलएम/HR/४४३६ दि. १४/१२/२०१८

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ३४ जिल्हे व ३५१ तालुक्यात इंटेन्सिव्ह पद्धतीने राबविण्यात येत आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यात जिल्हा व तालुकास्तरावर अनुक्रमे जिल्हा व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षांची स्थापना करण्यात आली असून राज्यस्तरापासून ते ग्रामस्तरापर्यंत स्वतंत्र व संवेदनशील यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा तसेच तालुका स्तरावर कंत्राटी तत्वावर अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

सदर अधिकारी/कर्मचारी यांचे कराराचे नूतनीकरण विहित कालावधीमध्ये होण्यासाठी संदर्भ क्र. १ अन्वये अधिकारी/कर्मचारी यांनी Performance Assesment अहवाल करार नूतनीकरणाच्या दिनांकापासून ४५ दिवस अगोदर राज्य अभियान व्यवस्थापन कक्षास विनाविलंब सादर करणे बंधनकारक असल्याबाबत सूचित करण्यात आले होते. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये अधिकारी/कर्मचारी यांचे Performance Assesment अहवाल ज्या दिनांकास राज्य अभियान व्यवस्थापन कक्षामध्ये प्राप्त होतील ती दिनांक करार नूतनीकरणासाठी ग्राह्य धरण्यात येईल याबाबत सूचित करण्यात आले आहे.

सबब, राज्य अभियान व्यवस्थापन कक्षास अधिकारी/कर्मचारी यांचे करार नूतनीकरणासाठी त्यांचे Performance Assesment अहवाल ज्या दिनांकास प्राप्त झाले त्या दिनांकानुसार करार नूतणीकरणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे Performance Assesment अहवाल त्यांचे करार कालावधी संपल्यानंतर प्राप्त झाल्याने त्यांच्या करार उशिराने होत आहेत. त्यामुळे संबधितांच्या करार कालावधी संपल्यानंतर नवीन करार झालेल्या दिनांकापर्यंत वेतन/मानधन देय राहत नसल्याने संबधित अधिकारी/कर्मचारी या कार्यालयाकडे संपर्क करीत आहेत. सदरील अधिकारी/कर्मचारी यांच्या तक्रारीनुसार त्यांनी तालुका किंवा जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षात त्यांचे Performance Assesment अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केले असतानासुद्धा Appraiser व Reviewer यांचे अभिप्राय मुदतीमध्ये देत नसून कर्मचाऱ्यांचे Performance Assesment अहवाल राज्य अभियान व्यवस्थापन कक्षात दिरंगाईने सादर करीत असल्याबाबत निदर्शनास आले आहे.

तरी, अधिकारी/कर्मचारी यांचे Performance Assesmentअहवाल विहित वेळेत प्राप्त होण्यासाठी जिल्हा स्तरावरून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. अधिकारी/कर्मचारी यांनी आपला Performance Assesment अहवाल त्यांच्या करार नूतणीकरणाच्या दिनांकापासून ४५ दिवस अगोदर संबधित Appraiser कडे सादर करावा.
२. संबधीत Appraiser यांनी अधिकारी/कर्मचारी यांचे Performance Assesment अहवालावर पुढील सात दिवसाच्या आत आपले अभिप्राय नोंदवून संबधित Reviewer कडे सादर करावेत.
३. संबधीत अधिकारी/कर्मचारी यांचे Reviewer यांनी Performance Assesment अहवालावर पुढील सात दिवसाच्या आत आपले अभिप्राय नोंदवून राज्य अभियान व्यवस्थापन कक्षास सादर करावेत.
४. जिल्हास्तरावरून कार्यालयीन अधीक्षक तथा जिल्हा व्यवस्थापक-संपादणूक यांनी संबधीतअधिकारी/कर्मचारी यांचे Performance Assesment अहवाल राज्य अभियान व्यवस्थापन कक्षाकडे सादर करण्यासाठी सर्व स्तरावर समन्वय करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी विहित वेळेत आपले Performance Assesment अहवाल विहित वेळेत सादर करून Appraiser व Reviewer यांनी आपले अभिप्राय तात्काळ नोंदवून राज्य अभियान व्यवस्थापन कक्षास सादर करावेत. करार नूतनीकरणासाठी अधिकारी/कर्मचारी यांचे Performance Assesment अहवाल विहित वेळेत प्राप्त न झाल्यास ज्या स्तरावर प्रलंबित असतील त्या संबधित अधिकारी/कर्मचाऱ्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. त्यानुसार अधिकारी/कर्मचारी यांनी विहित कालावधीत सादर न केल्यास त्यांना पुर्नानियुक्ती द्यावी किंवा कसे याबाबत राज्य अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत निर्णय घेण्यात येईल तसेच जिल्हा व तालुकास्तरावरील सहाय्यक कर्मचारी तसेच क्लस्टर कॉर्डीनेटर यांच्या पुर्नानियुक्ती बाबत जिल्हास्तरावरून मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. तथा जिल्हा अभियान संचालक यांनी निर्णय घ्यावा. पुर्नानियुक्ती द्यावयाची असल्यास अधिकारी/कर्मचारी यांचा करार कालावधी संपुष्टात आल्यापासून प्रत्यक्षात पुर्नानियुक्ती दिलेला दिनांक या दरम्यानच्या कालावधीमधील वेतन/मानधन देय राहणार नाही. तथापि, संबधित अधिकारी/कर्मचारी यांचे Performance Assesmentअहवाल सादर करण्यासाठी Appraiser किंवा Reviewer यांचे स्तरावर दिरंगाई झाल्यास संबधीतांच्या वेतन/मानधनामधून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून संबधित कर्मचाऱ्याच्या वेतनामधून कपात होणारी रक्कम त्यांच्या वेतन/मानधनामधून वसूल करण्यात यावी व संबधित अधिकारी/कर्मचारी यांना अदा करण्यात यावी.

तरी उपरोक्तप्रमाणे जिल्हा स्तरावरून योग्य ती करावाही करण्याबत संबधितांना सूचित करावे.

8-7/014

**आर. विमला, भा.प्र.से**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

**प्रत:**

१.मा.प्रकल्प संचालक, जिग्राविय तथा जिल्हा अभियान सहसंचालक, एमएसआरएलएम, सर्व जिल्हे
२.जिल्हा अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,एमएसआरएलएम, सर्व इंटेन्सिव्ह जिल्हे